पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
"क" प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ३
सभावृत्तांत

दिनांक:- २/६/२०१० वेळ.दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे "श्री.छत्रपती शिवाजी महाराज" सभागृहामध्ये दि.२/६/२०१० रोजी दु.१२.०० आयोजित करणेत आली होती.सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर | अध्यक्ष,क प्रभाग समिती |
| २. | मा.आल्हाट शांता महेंद्र | नगरसदस्या |
| ३. | मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ | नगरसदस्या |
| ४. | मा.बढे सुलोचना बबन | नगरसदस्या |
| ५. | मा.लोंढे वसंत (नाना) आनंदराव | नगरसदस्य |
| ६. | मा.लांडगे आशा अंकुश | नगरसदस्या |
| ७. | मा.मडिगेरी वर्षा विलास | नगरसदस्या |
| ८. | मा.सावळे सिमा | नगरसदस्या |
| ९. | मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर | नगरसदस्य |
| १०. | मा.गावडे सुषमा गोविंद | नगरसदस्या |
| ११. | मा.काटे राजेंद्र भिकनशेठ | नगरसदस्य |
| १२. | मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र | नगरसदस्य |
| १३. | मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण | नगरसदस्या |
| १४. | मा.आल्हाट संतोष बाबाजी | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री.एस.जे.वाळके प्रशासन अधिकारी,श्री.ऐ.ेएस.मरळे कार्यालयीन अधिक्षक, श्री.इ.बी.पाटील प्र.कार्यकारी अभियंता विद्युत,,श्री.एल.के.पीरजादे उप.अभियंता स्था,श्री.जी.एम.दांगट उप.अभि.जलनि:सारण, श्री.संजय घुबे उप.अभि.स्था.क मुख्यालय, श्री.राजेंद्र राणे उप.अभि.स्था. क मुख्यालय,श्री.प्रल्हाद चौधरी उप.अभि.पा.पु.,श्री..व्ही.सी काळे उप.अभियंता पा.पु.,श्री.डी.एस.सोनावणे उप.अभियंता स्थापत्य, श्री.अे.बी.मुलतानी सहा.आरोग्य अधिकारी,श्री.जानकर जे.एस.मुख्य आरोग्य निरिक्षक,श्री.एस.बी.शितोळे कनिष्ठ अभियंता जलनि:सारण क प्रभाग इ.अधिकारी सभेस हजर होते.

सर्वप्रथम मा.अध्यक्ष यांनी सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या,पदाधिकारी व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.यानंतर मा.सभासचिव यांनी दिनांक ५/५/२०१० च्या सभेचा सभावृत्तांत वाचन केल्यानंतर कायम करण्यात आला.

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक:-मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण अनुमोदक:- मा.सावळे सिमा

कै.मोहनदास तुकाराम गायकवाड यांचे निधन दि.२४/५/२०१० रोजी झाले असून ते मा.सुरदास तुकाराम गायकवाड नगरसदस्य यांचे बंधु होते.व कै. नंदकुमार वसंतराव रासकर रा.भोसरी यांचेही निधन झाले असलेने त्यांना श्रध्दाजंली वाहणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-

त्यानंतर मा.अध्यक्ष यांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रंध्दाजंली वाहणेत यावी , असे सांगितले.त्यानंतर श्रध्दाजंली वाहणेत आली.व त्यानंतर ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

त्यानंतर श्री. शेळके सहा.आरोग्य अधिकारी यांच्या दि.३१ मे २०१० रोजी झालेल्या सेवानिवृत्तीबाबत श्री.शेळके यांना मा.अध्यक्ष यांनी श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.त्याचप्रमाणे सर्व उपस्थित मा.नगरसदस्य/नगरसदस्या यांनीही पुष्पगुच्छ देवून त्यांनी केलेल्या कामांचे कौतुकास्पद भाषण करुन त्यांना पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

-------

ठराव क्र.१५८६ विषय क्र.१
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.क मुख्यालय
सुचक:-मा.सावळे सिमा अनुमोदक:- मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/३६७/२०१०,दि.१७/५/२०१० चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र.२५ बालाजीनगर येथील पेठ क्र.२ मोकळी जागा क्र.३ मध्ये सांस्कृतिक केंद्र बांधणेकामी र.रुपये १०,००,०००/-( अक्षरी र.रुपये दहा लाख फक्त )च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

--

ठराव क्र.१५८७ विषय क्र.२
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.क मुख्यालय
सुचक:-मा.सावळे सिमा अनुमोदक:- मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/३६८/२०१०,दि.१७/५/२०१० चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र.२५ बालाजीनगर येथील पेठ क्र.२ मोकळी जागा क्र.३ मध्ये स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रुपये ९,९०,०००/-( अक्षरी र.रुपये नऊ लाख नव्वद हजार फक्त )च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

<u>मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय</u>

ठराव क्र.१५८८ विषय क्र.३
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.क मुख्यालय
सुचक:-मा.बढे सुलोचना बबन अनुमोदक:-मा.लोंढे वसंत (नाना) आनंदराव
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/४११/२०१०,दि.३१/५/२०१० चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र.११,१२,१३, मधील विविध ठिकाणच्या म.न.पा.इमारतीचे किरकोळ दुरुस्तीचे कामे करणेकामी र.रुपये ९,९९,७००/-(अक्षरी र.रुपये नऊ लाख नव्याण्णव हजार सातशे फक्त )च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१५८९ विषय क्र.४
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.क मुख्यालय
सुचक:-मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर अनुमोदक:- मा.लांडगे आशा अंकुश
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/४१२/२०१०,दि.३१/५/२०१० चा प्रस्ताव
विषय:-म.न.पा.हद्दीतील पुणे-आळंदी रस्त्यावर विविध ठिकाणी साईन बोर्ड बसविणेकामी र.रुपये ९,९९,३००/-( अक्षरी र.रुपये नऊ लाख नव्याण्णव हजार तीनशे फक्त ) च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

ठराव क्र.१५९०	विषय क्र.५
दिनांक:- २/६/२०१०	विभाग:-पाणीपुरवठा
सुचक:-मा.काटे राजेंद्र भिकनशेठ	अनुमोदक:- मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/पापु/४०४/२०१०,दि.३१/५/२०१० चा प्रस्ताव
विषय:-प्रभाग क्र.१०१ फुगेवाडीचे सन २०१०/११ चे शिल्लक अंदाजपत्रकीय तरतुदीमधून खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे संदर्भिय कामांसाठी तरतुद वर्ग करणेत यावी व सदर कामाचे अंतिम बिल व तरतूदीसाठी मान्यता मिळणेकामी खालीलप्रमाणे ठेवणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नोव | लेखाशिर्ष | अ.क्र.व पानांक | सन १०/११ची तरतूद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.९९ शकरवाडी येथील भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती करणे | पा.पु.विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभाल | १३/६२५ | - | १५०००० | - | अ.क्र.१५ पानाक ६२५ चे कामामधून सदरची तरतूद वर्ग करणेत यावी |
| २ | प्रभाग क्र.१०० कासारवाडी येथील भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती करणे | पा.पु.विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभाल | १४/६२५ | - | १००००० | - | अ.क्र.१५ पानांक ६२५ चे कामामधून सदरची तरतूद वर्ग करणेत यावी. |
| ३ | प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी येथील भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती करणे | पा.पु.विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभाल | १५/६२५ | ३,५५,३०० शिल्लक तरतूद | - | २५०००० | वरील अ.क्र.१ व २ चे कामास सदर तरतूद वर्ग करणे |

प्रभाग क्र.१०१ फुगेवाडीचे सन २०१०/११ चे शिल्लक अंदाजपत्रकीय तरतुदीमधून खालील दर्शविल्याप्रमाणे संदर्भिय कामांसाठी तरतुद वर्ग करणेस व सदर कामाचे अंतिम बिल व तरतूदीसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र.१५९१	विषय क्र.६
दिनांक:- २/६/२०१०	विभाग:-स्थापत्य
सुचक:-मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण	अनुमोदक:-मा.आल्हाट शांता महेंद्र
संदर्भ:-मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण व मा.आल्हाट शांता महेंद्र यांचा दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-दापोडी येथील आरक्षण क्र.३/३५ भागश: रद्द करुन जमीन निवासी विभागात समाविष्ठ करणेकामी करावयाच्या फेरबदलास मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.महापालिका सभेकडे पाठविणेबाबत.

दापोडी येथील सर्व्हे नं.७१ ते ७८ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.३/३५ अन्वये ८ हेक्टर जमीन झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्रयोजनार्थ आरक्षित दर्शविलेली आहे.वास्तविक पाहता या जागेवर पूर्णपणे झोपडपट्टी नसून काही घरे ही पक्क्या स्वरुपाची व जागा मालकीची स्वत:ची घरे आहेत.सबब या घरांवर वरीलप्रमाणे टाकलेले आरक्षण योग्य नाही.व सदरची घरे ही १९८० पूर्वीची आहेत.

त्यामुळे खाजगी मालकाची पक्की घरे,चाळी व वसाहती वगळून उर्वरीत भाग झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी आरक्षित करणेत यावा.

या कामी मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सुधारीत रस्ते व झोन प्रस्तावित करुन फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीस मा.महापालिका सभेची मान्यता मिळणेकामी शिफारस करणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

ठराव क्र.१५९२ विषय क्र.७
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्थापत्य
सुचक:-मा.गावडे सुषमा गोविंद अनुमोदक:- मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र
संदर्भ:-मा.गावडे सुषमा गोविंद व मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र यांचा दि.२/६/२०१०चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र.१०० कासारवाडी येथे रेल्वेगेटाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत कै.भिमराव महादू जवळकर ( मा.सभापती शिक्षणमंडळ पिं.चिं.मनपा प्रवेशद्वार ) या नावाची कमान बाधणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सौजन्य - सौ.सुषमा गोविंद गावडे - नगरसेविका

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१५९३ विषय क्र.८
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-ड्रेनेज
सुचक:-मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र अनुमोदक:- मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर
संदर्भ:-मा.ओव्हाळ नितीन उर्फ सनी रामचंद्र व मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर यांचा दि.२/६/२०१०चा प्रस्ताव
विषय:- वॉर्ड क्र.१०३ मध्ये म.फुलेनगर परिसरात राहिलेल्या ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेबाबत.

दापोडी वॉर्ड क्र.१०३ म.फुलेनगर परिसरात काही ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकलेल्या नाहीत.तरी दापोडी म.फुलेनगर मध्ये राहिलेल्या ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये ९,९९,०००/-च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.१५९४ विषय क्र.९
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्थापत्य
सुचक:-मा.बढे सुलोचना बबन अनुमोदक:- मा.सावळे सिमा
संदर्भ:- मा.मडिगेरी वर्षा विलास यांचा दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:- वॉर्ड क्र.२४ इंद्रायणीनगर सेक्टर नं - १, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या प्राथमिक शाळेस "श्री वैष्णोमाता प्राथमिक विद्या मंदिर"असे नामकरण करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र.१५९५ विषय क्र.१०
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-आरोग्य
सुचक:-मा.बढे सुलोचना बबन अनुमोदक:- मा.सावळे सिमा
संदर्भ:- मा.मडिगेरी वर्षा विलास यांचा दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र.२४ इंद्रायणीनगर सेक्टर नं -२ येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील एक खोली वॉर्ड २४ व २१ साठी आरोग्य निरिक्षक कार्यालय सुरु करण्यास तात्पूर्ती मान्यता द्यावी या आरोग्य निरिक्षक कार्यालयासाठी कायम स्वरुपी सोय होई पर्यंत सदरच्या क्रीडा संकुलात त्यांना बसण्यास मंजूरी देणेत येत आहे.सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१५९६ विषय क्र.११
दिनांक:- २/६/२०१० विभाग:- आरोग्य
सुचक:-मा.लांडगे आशा अंकुश अनुमोदक:- मा.मडिगेरी वर्षा विलास
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/१५/कावि/५३९/२०१०,दि.२/०६/२०१० चा प्रस्ताव
विषय:- तरतूद वर्ग करणेबाबत.

पिंपरी चिंचवड क प्रभाग आरोग्य विभागाचे सन २०१० -२०११ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पात हॉटेलवेस्ट गोळा करणे व वहातूक करणे या लेखाशिर्षावर र.रु..८,००,०००/-एवढी तरतूद करणेत आलेली आहे. सदर तरतूदीमधून आजअखेर र.रु.४,३५,५४०/- इतका खर्च झाला असून र.रु.३,६४,४६०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

उपलब्ध असलेली तरतूद कामकाज पाहता भविष्यात अपुरी पडणार असून दैनंदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होवू शकतो.

सबब,हॉटेल वेस्ट वहातूक खर्च या लेखाशिर्षावर र.रु. १०,००,०००/-इतकी तरतूद वर्ग होणे आवश्यक आहे.सदरची रक्कम कचरा उचलणे व हलविणे या लेखाशिर्षातून वर्ग करता येणे शक्य आहे.तरी सदरची तरतूद वर्ग करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

परिशिष्ट अ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
क प्रभाग,आरोग्य विभाग

| अ.क | लेखाशिर्षाचे नांव | सन २०१० २०११-मूळ तरतूद | दि.३१/५/१० अखेर झालेला खर्च | दि.३१/५/१० अखेर शिल्लक | वर्ग करावयाची रक्कम | वर्ग करावयाचे लेखाशिर्ष | मूळ तरतूद | वर्ग केल्यावर होणारी शिल्लक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हॉटेल वेस्ट वहातूक खर्च | ८००००० | ४३५५४० | ३६४४६० | १०००००० | कचरा उचलणे व हलविणे | ५०००००० | ४०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र.१५९७ विषय क्र.१२
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-विद्युत
सुचक:-मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर अनुमोदक:- मा.गावडे सुषमा गोविंद
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/वि/जा/३३१/२०१०,दि.१/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-तरतूद वर्ग करणे बाबत.

भोसरी जलतरण तलाव येथील मोटर व अन्य फिल्ट्रेशन यंत्रणेअंतर्गत मशिनरी नादुरुस्त झालेने सदर तलाव दुरुस्तीसाठी बंद आहे.सदर कामे तातडीने करुन घेणेच्या मा.आयुक्त सो.यांनी सुचना दिलेल्या आहेत. तसेच मा.अति.आयुक्त यांच्या दालणात झालेल्या बैठकीमध्ये सदरची कामे करणेस तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे विद्युत क प्रभाग अंदाजपत्रक सन २०११ प्रमाणे किरकोळ दुरुस्ती देखभाल या लेखाशिर्षावरील क प्रभाग कार्यक्षेत्रातील मनपाच्या सर्व रुग्णालये ओपीडी दवाखाने औषधालये इत्यादी मधील विद्युतीकरणाचे देखभाल व दुरुस्ती करणे ( आवश्यकतेनुसार विद्युतीकरण करणेत येईल व विद्युतीकरणाचे देखभाल व दुरुस्ती करणे.) या कामाची तरतूद अंदाजपत्रक पान क्र.५०५ अनुक्रमांक १६ र.रुपये ६०००००/- पैकी र.रु.३५००००/-इतकी रक्कम अंदाजपत्रक पान क्र.५०२ अ.क्र.४ कामाचे नांव भोसरी जलतरण तलावाकरीता विद्युत विषयक कामे करणे ( आवश्यकतेप्रमाणे विद्युतीकरण करुन व विद्युत व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे ) या कामावर वर्ग करणेस व सदर कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१५९८ विषय क्र.१३
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्थापत्य क मुख्यालय
सुचक:-मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ अनुमोदक:- मा.आल्हाट शांता महेंद्र
संदर्भ:-मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ व मा.आल्हाट शांता महेंद्र यांचा दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:- सद्‌गुरुनगर प्रभाग क्र.१४ येथील व्यायामशाळा संतोषभाऊ लांडगे स्पोर्ट फाऊंडेशन नामकरण करणेबाबत......

पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे सद्‌गुरुनगर प्रभ्‌ाग क्र.१४ येथे व्यायाम शाळा बांधणेत आलेली आहे. सदर व्यायामशाळा इमारतीचे काम पूर्ण झाले असून सदर इमारतीस संतोषभाऊ लांडगे स्पोर्टस्‌ फाऊंडेशन असे नामकरण करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१५९९ विषय क्र.१४
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-विद्युत
सुचक:-मा.लांडगे सारिकाताई संतोषभाऊ अनुमोदक:- मा.बढे सुलोचना बबन
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/वि/जा/३३२/२०१०,दि.१/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-क प्रभाग विद्युत विभागाच्या कार्यक्षेत्रात होणा-या विविध उद्‌घाटन कार्यक्रमासाठी वार्षीक पध्दतीने ध्वनीक्षेपण व प्रकाशव्यवस्था करणेकामी र.रुपये ८,१४,०००/-( अक्षरी र.रुपये आठ लाख चौदा हजार फक्त ) च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१६०० विषय क्र.१५
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.मुख्यालय
सुचक:-मा.सावळे सिमा अनुमोदक:- मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/४२३/२०१०,दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-सन २०१०-२०११ स्थापत्य क प्रभाग अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करुन तरतुद वर्गीकरणाबाबत.

| अ.क्र | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पान क्र.व अ.क्र. | सन २०१० -११ ची तरतूद | सन २०१०-११ची सुधारीत तरतूद | वाढ | घट | शिल्लक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.७ मधील कायनेटीक केअर (टी-९७)समोरील रस्त्यांचे रुंदीकरण केलेल्या भागाचे डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती देखभाल | २२०/९ | ४००००० | २९२००० | ० | १०८००० | ० |
| २ | प्रभाग क्र.२५ बालाजीनगर येथील एम.आय.डी.सी मधील इलेक्ट्रॉनीक झोन मध्ये गटर दुरुस्ती व स्थापत्य विषयक सुधारणांची कामे करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल | २३७/४३ | ० | ६६००० | ६६००० | ० | ० |
| ३ | प्रभाग क्र.२६ महात्मा फुलेनगर येथील हॉकी पॉलीग्रास मैदानावर पाणी मारण्यासाठी पाईप लाईन करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल | २३९/६७ | ७५००० | १०४००० | २९००० | ० | ० |
| ४ | प्रभाग क्र.७ मधील मनपा इमारतीचे किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | किरकोळ दुरुस्ती देखभाल | २३६/२५ | ० | ० | १३००० | ० | ० |
| | | | | | | १०८००० | १०८००० | |

तरी वरील प्रमाणे मनपाचे सन २०१०-११ चे अंदाजपत्रकातील तरतुदीत कोणतीही वाढ न करता रक्कम वर्ग करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१६०१ विषय क्र.१६
दिनांक:- २/६/२०१० विभाग:-स्था.मुख्यालय
सुचक:-मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर अनुमोदक:- मा.मडिगेरी वर्षा विलास
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील क्र.कप्र/स्था/कमु/४२४/२०१०,दि.२/६/२०१० चा प्रस्ताव
विषय:-वॉर्ड क्र. २३ गुळवेवस्ती मधील मनपाचे सन २०१०-११ चे अंदाजपत्रक खालील प्रमाणे तरतुद वर्गीकरणाबाबत.

| अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | सन २००९-२०१० ची तरतुद | सन २००९-१० ची सुधारीत तरतुद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती येथे स्वच्छतागृह बांधणे | प अंदाजपत्रक संडास व मुता-या | ६९७/१२ | ५३५००० | १०५००० | ०० | ४३०००० | घट |
| २ | वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती येथे गटर्स व स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल | २३९/६२ | ०० | ३४०००० | ३४०००० | ०० | वाढ |
| ३ | वॉर्ड क्र.२३ मध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | वॉर्ड स्तरीय योजना अंतर्गत कामे | २४९/२ | ०० | ९०००० | ९०००० | ०० | वाढ |
| | | | | | ४३०००० | ४३०००० | ४३०००० | |

तरी वरील प्रमाणे मनपाचे सन २०१०-११ चे अंदाजपत्रकातील एकुण तरतुदीत कोणतीही वाढ न करता रक्कम वर्ग करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१६०२ विषय क्र.१७

दिनांकः- २/६/२०१० विभागः-स्था.मुख्यालय

सुचकः-मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर अनुमोदकः- मा.आल्हाट शांता महेंद्र

संदर्भः-मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर व मा.आल्हाट शांता महेंद्र यांचा दि.२/६/२०१० चा प्रस्ताव

विषयः-वॉर्ड क्र. २३ गुळवेवस्ती येथील लोंढे व्यायामशाळेजवळ तात्पुरती रुम बांधणेबाबत.

गुळवेवस्ती वॉर्ड क्र.२३ मध्ये शांतीनगरच्या मागील भागातील लोंढे व्यायामशाळेजवळ सार्वजनिक कामांसाठी तातुरत्या स्वरुपात सुमारे ५०"X२५" आकाराची मोठी रुम बांधून व त्यावर लोखंडी पत्रा इ.प्रकारचे काम केल्यास परिसरातील नागरिकांना त्याचा चांगला उपयोग होईल. तरी अशा प्रकारे मोठी रुम सार्वजनिक कामासाठी बांधणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर)
अध्यक्ष
"क"प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
जा.क्र.कप्र/९/सभा/कावि/८३/२०१०
दिनांकः- १०/६/२०१०

सही/-
प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
"क"प्रभाग समिती